# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. 184 /२०२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित, कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र या महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. बैठक—२०२०/प्र.क्र.५३/२०/ विशि—१, दि. २९/१०/२०२१ अन्वये दि. २३/१०/१९९२ ते दि. ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, होम सायन्स, सोशलवर्क, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र या महाविद्यालयांचे/ परिसंस्थेचे प्राचार्य/संचालक यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास मा. व्यवस्थापन परिषदेने दि. १२ एप्रिल, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयान्वये ''दि. २३/१०/१९९२ ते दि. ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरू ठेवण्यात आलेल्या असल्याने अशा अध्यापकांना त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राहय धरून तत्कालीन प्रचलित धोरणानुसार सेवानिवृत्ती वेतन देय राहील'' अशा अध्यापकांचे प्रस्ताव शिक्षक मान्यतेसाठी लवकरात लवकर या विभागाकडे पाठवावेत.

सुलभ संदर्भासाठी शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली असून सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

20/6/2022

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७. )
जावक क्र. सीसीओ/ 1865 )
दि. 20/06/2022 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : मा. प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये.